दिवाणी दावा क्र.२१३/२०१२
सुर्यकांत- वि- प्रकाश
नि.क्र.४१ वर

**<u>अर्जदारचा सरतपास वकील श्री.एस.डब्लू. तिजारे यांचेमार्फत शपथेवर सुरू:-</u>**

आता मला माझे सर तपासाचे प्रतिज्ञापत्र दाखविले. ते माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**सदर अर्जाचे चौकशी कामी मी खालीलप्रमाणे कागदपत्रं दाखल केलेली आहेत :-**

१. मी माझे वडिलांनी प्रकाश ढगे यांच्या बाजूने करून दिलेले आव्हानित मृत्युपत्राची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्याला नि.४३ देण्यात येते.

२. प्रतिवादी क्र.२ यांच्या हक्कात माझे वडिलांनी करून दिलेले आव्हानित बक्षिसपत्राची प्रत दाखल केले आहे. त्याला नि.४४ देण्यात येते.

३. माझे वडिलांनी प्रतिवादी क्र.२ यांच्या हक्कात दुसरे आव्हानित मृत्युपत्र करून दिले आहे, ते दाखल केले आहे. त्याला नि.४५ देण्यात येते.

४. माझे वडिलांचे प्रकृती बरोबर असल्यासंबंधी आव्हानित मेडिकल प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्याला नि.४६ देण्यात येते.

५. मी वादसंपत्तीची आव्हानित फेरफार नोंद प्रत दाखल केले आहे. त्याला नि.४७ देण्यात येते.

६. माझे वडिलांच्या मृत्युचा दाखला दाखल केले आहे. त्याला नि.४८ देण्यात येते.

७. वादशेतीचा गाव नमुना क दाखल केले आहे. त्याला नि.४९ देण्यात येते.

८. माझे वडिल बोलत असल्यासंबंधी व्हिडीओ कॅसेटवरून लेखी स्वरूपात असलेला दस्त अभिलेखावर दाखल केले आहे. त्याला आर्टीकल 'अ' देण्यात येते.

९. सोसायटीने मला दिलेले पत्र दाखल केले आहे. त्याला नि.५० देण्यात येते.

१०. जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण विकास बॅकेचे कर्ज नसल्याचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्याला नि.५१ देण्यात येते.

११. स्टेट बॅकेचे देय नसल्यासंबंधी प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्याला नि.५२ देण्यात येते.

१२. बॅक ऑफ इंडियाचे देय नसलयासंबंधी प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्याला नि.५३ देण्यात येते.

१३. वादशेती वर्ग–२ मध्ये असल्यासंबंधी सात बाराची प्रत दाखल केले आहे. त्याला नि.५४ देण्यात येते.

१४. वादी क्र.२ यांनी घर विकल्यासंबंधी आव्हानित खरेदीखत दाखल केले आहे. त्याला नि.५५ देण्यात येते.

१५. नगर परिषदमध्ये घराचा कर भरल्यासंबंधीची पावती दाखल केले आहे. त्याला नि.५६ देण्यात येते.

१६. वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रूग्णालय उमरेड यांनी दिलेले माहितीच्या अधिकारातील माहितीचे दस्त दाखल केले आहे. त्याला नि.५७ देण्यात येते.

१७. प्रतिवादीचे संपत्तीसंबंधी माहितीचे अधिकारात आलेली माहिती दाखल केले आहे. त्याला नि.५८ देण्यात येते.

१८. अधिकार अभिलेख ची प्रत दाखल केले आहे. त्याला नि.५९ देण्यात येते.

१९. प्रतिवादी क्र.१ चे पत्नीने एक शेती विकत घेतल्यासंबंधी सातबारा दाखल केले आहे. त्याला नि.६० देण्यात येते.

२०. प्रतिवादी क्र.१ ने शेती विकत घेतल्यासंबंधी सातबारा दाखल केले आहे. त्याला नि.६१ देण्यात येते.

२१. प्रतिवादी क्र.२ ने शेती विकत घेतल्यासंबंधी सातबारा दाखल केले आहे. त्याला नि.६२ देण्यात येते.

२२. मी माझे आईचा उपचार केल्यासंबंधी डिस्चार्ज कार्ड दाखल केले आहे. त्याला नि.६३ देण्यात येते.

२३. मी आईच्या उपचारासंबंधी पावती दाखल केले आहे. त्याला नि.६४ देण्यात येते.

२४. प्रतिवादी क्र.१ ने माझे बहिणीला तेरवीची पत्रिका पोस्टाने पाठविली होती, त्याचे पोच पावती दाखल केली आहे. त्याला नि.६५ देण्यात येते. व त्यामधील पत्रिकेला नि.६६ देण्यात येते.

२५. माझे वडिलांच्या संभाषणाची सि.डी. चित्रफित दाखल केली आहे, त्यासंबंधी भारतीय पुरावा कायदा कलम ६५-ब नुसार प्रमाणपत्र लावले आहे, ते दाखल केले आहे. त्याला नि.६७ देण्यात येते.

२६. घराची वाटणी झाल्यासंबंधी दस्त दाखल केले आहे. त्याला आर्टीकल ब देण्यात येते.

२७. माहितीचे अधिकारअंतर्गत मला सब रजिस्ट्रार यांनी मला पत्र दिले होते, ते दाखल केले आहे. त्याला नि.६८ देण्यात येते.

२८. स्टॅम्प विक्रेता याच्या रजिस्टरची प्रत दाखल केली आहे. त्याला नि.६९ देण्यात येते.

**वादीचे वकील श्री. तिजारे यांना सि.डी. ही पुरावा म्हणून दयायची आहे परंतु आज रोजी सि.डी. वाजविण्याकरिता उपकरण उपलब्ध नसल्यामुळे पुढील तारखेपर्यंत सरतपास तहकुब करण्यात येत आहे**.

वा.दा.ब.अ.क.केले. समक्ष,

दि.न्या क.स्तर.
उमरेड

(ए.व्ही. पंडित)
सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
उमरेड.
दि.१०.१२.२०२०